## समुदाय संघटन आणि सामाजिक समावेशनाची कार्यपद्धती
### (Protocol on Social Mobilization and Social Inclusion)

# Contents

अ. गाव कसे निवडावे? ........ 3

आ. गावप्रवेश पूर्व बैठक ........ 3

इ. गाव फेरीसाठीचे व्यवस्थापन ........ 4

ई. गावात प्रवेश केल्यानंतर - ........ 4

उ. खर्चाचे लेखाशीर्ष ........ 4

ऊ. गटाची Life Cycle ........ 5

परिशिष्ट क्र. १ - गावफेरी करिता आवश्यक साहित्य सूची एकदा करावयाचा खर्च (अ.) ........ 6

परिशिष्ट क्र. २ - मोबिलायजेशन कीट - ........ 6

परिशिष्ट क्र. ३ - आयोजक / प्रेरक जिल्हा आणि वर्धीनिनी करावयाची तयारी ........ 7

परिशिष्ट क्र ४ - प्रपत्राची महिती ........ 9

**समुदाय संघटन आणि सामाजिक समावेशनाची कार्यपद्धती**

**(Protocol on Social Mobilization and Social Inclusion)**

समुदाय संघटन आणि त्यासाठी आवश्यक असणारी वातावरण निर्मिती हा उमेदच्या कामाचा पाया आहे. हा पाया मजबूत असावा यासाठी सामाजिक संघटन आणि सामाजिक समावेशनाची (**Social Mobilization and Social Inclusion**) कार्यपद्धती कशी असावी याबाबतची ही मार्गदर्शिका आहे. अभियानामध्ये सामाजिक समावेशन आणि संघटन बांधणीसाठी वापरल्या जाणाऱ्या काही प्रमुख संकल्पनांच्या व्याख्या / अर्थ खालील प्रमाणे आहेत -

- **गाव प्रवेश (Village Entry)** - एखाद्या गावात उमेदने निर्देशित केल्याप्रमाणे सामाजिक समावेशन आणि संघटन बांधणी करण्यासाठी गावात सुरवात करणे म्हणजे गाव प्रवेश होय.
- **सक्रीय महिला (Active Women)** - उमेदने निर्देशित केलेल्या निकषांनुसार गाव पातळीवर स्वत:च्या गावात काम करू इच्छिणारी महिला. गाव प्रवेशाच्या वेळेस किमान २ महिला निकषांनुसार निवडाव्यात. भविष्यात या महिला प्रेरिका (Community Facilitator/ पूर्वीचे पदनाम iCRP), वर्धिनी (eCRP), ग्रामसंघ लेखापाल/ मास्टर बुक कीपर/ बँक सखी / सूक्ष्म गुंतवणूक आराखडा - संसाधन व्यक्ती (MIP-CRP) इ. या पदांवर काम करू शकतील.
- **प्रेरिका (Community Facilitator)** – ज्या सक्रीय महिलेने निवड झाल्यानंतर स्वत:च्या गावात स्वेच्छेने किमान ६ महिने काम केले आहे. CRM १ चे प्रशिक्षण घेतले आहे. १५ दिवसांची गावफेरी पूर्ण झाल्यावर आमसभेमध्ये व सर्व गटातील महिलांकडून तिच्या नावाला अनुमोदन मिळाले आहे. ग्रामसंघ स्थापन झाल्यावर ग्रामसंघाने तिच्या निवडीला मान्यता देऊन त्यांच्या इतिवृत्तावर नोंद घेतली आहे अशी महिला प्रेरिका ही गावपातळीवर काम पाहील.
- **Saturation** – जेंव्हा उमेदने काम सुरु केलेल्या गावामध्ये गरीब/अतिगरीब कुटुंबांचा ग्रामसंघामध्ये समावेश होईल; तसेच प्रत्येक गरीब कुटुंबातील किमान एका महिलेस स्वयंसहाय्यता गटात आणले जाईल तेंव्हा त्या गावाचे Saturation झाले आहे असे म्हणता येईल. यासाठी ग्रामसंघ व गावातील अन्य महत्वाच्या व्यक्तींद्वारे (stakeholder) लोकसहभागातून वंचित कुटुंबं निर्धारण (PIP) प्रक्रिया पूर्ण केलेली असावी.
- **वर्धिनी चमू** - स्वयंसहायत्ता समुहामध्ये स्वतःच्या किंवा इतर गटाच्या कामाचा किमान आठ महीने ते १ वर्षापर्यंत अनुभव असलेल्या, गरिबीतून बाहेर पडून स्वत: इतरांसाठी प्रेरणास्त्रोत ठरलेल्या, एकत्रितरीत्या काम करणाऱ्या चार ते पाच महिलांच्या चमूला वर्धिनी चमू म्हणावे. यामध्ये तीन महिला समुदाय संघटनेचे (Community Mobilization) व दोन महिला हिशोबनीसाचे (book keeper) काम करतील. पण हा चमू चार जणींचा केल्यास दोघीजणी समुदाय संघटनेचे (Community Mobilization) व दोघीजणी हिशोबनिसाचे काम करतील.

  स्वतःचे गाव सोडून इतर गावांमध्ये समुदाय संघटन आणि सामाजिक समवेशांनासाठी जाणाऱ्या महिलांना वर्धिनी म्हणून संबोधण्यात येईल. ज्या जिल्ह्यात बाहेरील जिल्ह्यातून वर्धिनी येतील त्याला **आयोजक जिल्हा / तालुका** म्हणावे आणि ज्या जिल्ह्यातून वर्धिनी येणार आहेत त्यांना **प्रेरक जिल्हा / तालुका** असे संबोधावे.

## अ. गाव कसे निवडावे?

1. गाव निवडतांना प्रत्येक प्रभागातील (Cluster) सर्व गावांची यादी तयार करावी.
2. ज्या गावात आधी काम झाले आहे त्याच्या शेजारील गाव घ्यावे.
3. शेजारील गाव निवडतांना अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती, भटक्या जाती - जमाती आणि अल्पसंख्याकांची लोकसंख्या जास्त असेल त्या गावांना प्राधान्य द्यावे.
4. ज्या गावात सध्या माविम, IWMP किंवा इतर संस्थांचे काम ५०% पेक्षा जास्त कुटुंबांसोबत काम चालू आहे, त्या गावांना क्रमवारीत शेवटी ठेवावे. या गावांच्या saturation साठी त्या संस्थाशी सुरवतीपासून समन्वय साधून, कामाची पुढील रणनीती ठरविण्याचे प्रयत्न करावेत. जेणेकरून त्या गावातील गरीब कुटुंबांपर्यंत पोहोचून त्यांना अभियानामध्ये समाविष्ट करण्याच्या प्रक्रियेला या संस्थांच्या मदतीने सुरुवात होईल.

   **<u>टीप: 15 दिवसांच्या गावफेरीमध्ये गावातील अनुसूचीत जाती जमातीच्या पाडे/ वस्ती/ गल्ली यापासून समुदाय संघटन व सामाजिक समावेशनाला सुरुवात करावी.</u>**

5. ज्या गावात प्रवेश करावयाचा आहे त्या गावाची प्राथमिक माहिती गावात जाण्यापूर्वी **<u>परिशिष्ट क्र. ४</u>** मधील १.१. च्या आधारे गोळा करावी आणि त्याची खात्री गाव प्रवेशपूर्व भेटीत करावी. *(मिळालेल्या माहितीचे स्त्रोत census data व ग्रामपंचायत तसेच गटचर्चेच्या माध्यमातून असेल)*
6. गावात काम सुरु करण्याचे दोन टप्पे असतील. एक, गाव प्रवेशपूर्व बैठक आणि दोन, प्रत्यक्षात गावात 15 दिवसाच्या फेरीमध्ये सामाजिक संघटन (social mobilisation) वर्धीनिंच्या माध्यमातून करणे. वर्धीनींची फळी तयार होईपर्यंत उमेदच्या कर्मचाऱ्यांनी गाव फेरीचे काम करावे.
7. गावात काम सुरु करण्यापूर्वी **<u>परिशिष्ट क्र. १</u>** मध्ये दर्शविल्यानुसार साहित्याची खरेदी जिल्हा स्तरावर करावी. यासाठी जिल्हास्तरावर विहित संपादणूक प्रक्रियेचा अवलंब करावा.
8. फेरीसाठी जिल्ह्याच्या बाहेरून चमू येणार असेल तर आयोजक जिल्हा व प्रेरक जिल्ह्याने **<u>परिशिष्ट क्र. ३</u>** नुसार नियोजन करावे.

## आ. गावप्रवेश पूर्व बैठक

1. गावात प्रत्यक्ष जाऊन त्या गावातील माहितगार व्यक्तींची भेट घेणे / बैठक घेणे म्हणजे गाव प्रवेशपूर्व बैठक होय. या भेटीची उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत.-
   a. गाव नीट समजून घेणे.
   b. गावातील माहितगार व्यक्तींना 'उमेद' ची माहिती देणे.
   c. गावासोबत १५ दिवसांच्या फेरीची तारीख निश्चित करणे.
   d. सक्रीय महिला (active women) शोधणे.
2. गावामध्ये साधारणपणे खालील माहितगार व्यक्तींची भेट घ्यावी -
   a. गावात अस्तित्वात असणाऱ्या स्वयंसहाय्यता गटाच्या महिला;
   b. अंगणवाडी सेविका / शाळेतील शिक्षक / आशा कार्यकर्ती
   c. सरपंच, ग्राम पंचायत सदस्य विशेषत: महिला सदस्य, ग्राम सेवक
   d. वेगवेगळ्या समाजातील वृद्ध व्यक्तींना भेटावे.
   e. गावाचे पाडे / वाड्या /वस्त्या येथे किमान भेट देऊन गाव परिस्थितीचा अंदाज घ्यावा.
3. गावात जाण्यासाठीचे कीट तयार करावे. त्याची यादी **<u>परिशिष्ट क्र.</u>** २ मध्ये पहावी.

गावफेरीमध्ये वर्धीनींना साहित्य उपलब्ध करून द्यावे.

**इ. गाव फेरीसाठीचे व्यवस्थापन**

**गाव फेरीसाठी वर्धीनिंच्या चमूचे नियोजन करताना :**

1. जिल्हयात सध्या गावपातळीवर काम करणाऱ्या गटातील महिलांची निवड निकष, अनुभव व कौशल्याच्या आधारे फेरीसाठी करावी. (वर्धिनी निवड निकषांसाठी उमेदचे पत्र क्र. MSRLM / CB / ................../२०१५ दि. हे संदर्भासाठी वापरावे.)
2. ज्या तालुक्यांमध्ये अंतर्गत वर्धिनी चमू उपलब्ध होणार नाहीत अशा ठिकाणी इतर तालुक्यातून व जिल्हयातून वर्धिनी चमू पाठविण्यात येईल.
3. ज्या गावात आधी गाव प्रवेश झालेला आहे तेथील सक्रीय महिलांना वर्धिनी फेरीसोबत संलग्न करावे.

**ई. गावात प्रवेश केल्यानंतर –**

प्रपत्र ५ मधील क्र. २.२ मध्ये दिलेल्या १५ दिवसीय कृती आराखड्यानुसार नियोजन केल्याप्रमाणे १५ दिवसाच्या फेरीमध्ये काम करावे.

**उ. खर्चाचे लेखाशीर्ष**

वर्धीनीचे मानधन रु 300 व निवास आणि भोजन खर्च रु.२००/- प्रति दिवस प्रति वर्धिनी देण्यात यावे यांना प्रवास खर्च जितका-आहे-तितका (at actual) द्यावा. हा खर्च लेखाशीर्ष B.२.२.१. मधून खर्च करावा.